FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-1

69643

पहिली खबर
FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा [illegible] पोलीस ठाणे येवला [illegible] पहिली खबर क्र. II-८४ वर्ष २०१८ दिनांक ८।४।२०१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. [illegible] कलमे Sections कलम - ७ प्रमाणे
(ii) अधिनियम Act [illegible] कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

(a) अपराधाची घटना : वार [illegible] तारीख पासून ०६।२।१८ [illegible] तारीख पर्यंत ०६।२।१८ वेळ [illegible] १४:०० वा.
Occurrence of Offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00
6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ८।४।२०१८ वेळ ९४:३० वा.
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २९/२०१८ तारीख ८।४।१८ वेळ ९४:४८ वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा [illegible] चौकी /बीट /दुरक्षेत्र नाव व क्र. [illegible]
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. [illegible] Chouki/ Beat/ O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव [illegible] ठिकाणाचे नंबर [illegible] गल्ली [illegible] रस्त्याचे नाव [illegible]
Address of Occurrence : Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण गाव [illegible] पोष्ट तालुका येवला जिल्हा नाशिक राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable Place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव .... तालुका .... जिल्हा .... राज्य ....
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant /Informant : Permanent Address

(a) नाव [illegible] Name (b) वडिलाचे / पतीचे नाव [illegible] पाटील Father's/Husbands Name

(c) जन्म तारीख व वय ३९ Date of Birth & Age (d) राष्ट्रीयत्व भारतीय Nationality फोन नं. [illegible] Phone No.

(e) पारपत्र क्रमांक .... Passport No. दिल्याचा दिनांक [illegible] Date of Issue दिल्याचे ठिकाण [illegible] Place of Issue (f) व्यवसाय [illegible] Occupation

(g) धर्म Religion हिंदु जात Caste मराठा जनजात Sub-Caste ....

(h) पत्ता : प्लॉट/सर्वे नं. [illegible] घर/नाव नंबर .... फोन/मो. नंबर .... पॅन नं. .... ओटर्स नं. ....
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव .... जवळचे प्रसिध्द ठिकाण .... गाव [illegible] पोष्ट [illegible] पो. स्टे. [illegible]
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका [illegible] जिल्हा जळगाव राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता [illegible]
Taluka Dist. State Present Address

माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I-B वर वेगळ्या सिटर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary)

(१) [illegible] पो.शि. [illegible] नेम. येवला तालुका पो. स्टे. [illegible] पोलीस वसाहत येवला ता. येवला

म.मु.औ.(वाय) ३५४-(२०००पुस्तके)-१-२०१६

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे [illegible]
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ....
Total value of properties stolen/ involved.
b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) ....

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ....
Unnatural/Accidental Death. case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
F. I. R. Information brief Contents (Attach separate sheets, if required) :Detail Write down back blank page.

[illegible] आरोपी [illegible] येवला [illegible] दि. ०६।२।१८ रोजी [illegible] अपघात [illegible] येवला [illegible] गुन्हा दाखल आला [illegible] आवश्यक कागदपत्र [illegible] ९०,०००/- रु. [illegible] मागणी करून तडजोडी अंती ८०००/- रु. [illegible] मागणी करून [illegible] गुन्हा

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कलम नं. 2. मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा [illegible]
2. तपास नाकारण्यात आला. त्याचे कारण. ....
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन [illegible] जिल्हा [illegible] राज्य [illegible]
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No.2:
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .... Rank .... No. .... to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to .... (3) Transferred to P.S. ....
District .... on point of jurisdiction.

तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

[illegible] पाटील

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of the Officer Incharge Police Station
संपूर्ण नाव Name [illegible]
पदनाम Rank [illegible]
तपासिक अं. चा कोड क्र. [illegible]
Posting. येवला शहर
Code No. of I. O.

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ८।४।१८
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner

फिर्याद येवला शहर पोलीस ठाणे,
नाशिक ग्रामीण.
दिनांक - ०९/०५/२०१९

मी सचिन जनार्दन पाटील, वय - ३१ वर्षे, धंदा - ड्रायव्हर, मुळ राहणार - बिलाखेड, ता. चाळीसगांव, जिल्हा - जळगांव. हल्ली रा. खडकी बायपास, अंबिका ट्रॉलीमागे, बिलाखेड, ता. चाळीसगांव, जिल्हा - जळगांव, मो.व. ७७९८३५२६०२

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहून फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन मी गोवा येथील टाटा कंपनीची नवीन वाहने इतरत्र पोहचविण्याचा कॉन्ट्रॅक्ट झालेल्या कमल डोग्रा या ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये ड्रायव्हर म्हणुन काम करून माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

दिनांक ०७/०२/२०१९ रोजी गोवा येथुन टाटा कंपनीच्या दहा नवीन गाडयांना कॅन्व्हाय घेवुन आम्ही जमशेदपुर येथे पोहचविण्यासाठी निघालो होतो. प्रवासात असतांना दिनांक ०८/०२/२०१९ रोजी रात्री १०:०० वाजेचे सुमारास आमचे कॅन्व्हॉय मधील एका बसचा राजापूरचे पुढे सोमठाणे घाट, ता. येवला येथे ॲक्सिडेंट झाला त्यात बसवरील ड्रायव्हर असलेला माझा नातेवाईक विठ्ठल निंबा मराठे रा. डेराबर्डी, राजीव दादा नगर, चाळीसगांव यांचा मृत्यु झाला त्याबाबत येवला तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत ड्रायव्हर विठ्ठल मराठे हा माझा नातेवाईक असल्याने अक्सिडेंट क्लेमसाठी गुन्ह्याच्या कागदपत्रांची आवश्यकता होती म्हणुन मी दिनांक २६/०२/२०१९ रोजी येवला तालुका पोलीस स्टेशनला गेलो असता तेथील नागरे नावाच्या पोलीसाने माझ्याकडे अपघाताचे कागदपत्र देण्यासाठी व अपघाताचे वाहन परत करण्यासाठी १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली आहे. परंतु मला नागरे पोलीस यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे दिनांक २७/०२/२०१९ रोजी फोनकरून माहिती दिल्यावरून तेथील पोलीस निरीक्षक श्री. हेमंतकुमार भामरे यांची मला ते सापळा पथकासह माझी तक्रार नोंदवुन घेण्यासाठी येवला येथे लागलीच येत आहे असे कळवुन मला येवला शहरचे अलीकडे अंगणगांव येथील अतिथी हॉटेलचे समोर दुपारी ०२:०० वाजता भेटण्याबाबत सुचना दिली होती. त्याप्रमाणे मी माझेकडील दुचाकी वाहनासह दुपारी ०२:०० वाजता येवला शहराचे अलीकडे अंगणगांव येथील अतिथी हॉटेल समोर येवुन थांबलो होतो. त्यानंतर काही वेळातच तेथे एक बोलेरो गाडी आली. त्यावेळी मी गाडीत असलेल्या इसमांना आपण ॲन्टी करप्शन ऑफीस नाशुन आलात काय असे विचारले असता त्यांनी होय म्हणुन सांगितले व मला माझे नाव विचारले नंतर मला गाडीत बसण्यास सांगितले. मी वाहनात बसल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. भामरे यांनी त्यांची तसेच सापळा पथकातील पंच श्री. सचिन शंकर येलकर व श्री. सागर अशोक गायित आणि सापळा पथकातील पोहवा. मुरकुटे, पोहवा. डांगे, पोना. गरुड, पोशि. अहिरराव, चालक पोशि. शिंदी अशांचा परिचय करून देवुन माझाही परिचय सर्वांना करून दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. भामरे यांनी पंचासमक्ष मला माझे तक्रारी बाबत विचारले असता त्यांना मी माझी वरील प्रमाणे तक्रार सांगितली असता ती पोना. गरुड यांनी त्यांचे हस्ताक्षरात लिहुन घेतली. माझी वरील प्रमाणेची तक्रार मला वाचुन दाखविल्यानंतर मी ती बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर सही केल्यानंतर सदर तक्रारीवर पोनि श्री. भामरे व पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे येवला तालुका पोलीस स्टेशन येथील नागरे पोलीस हे स्वतःसाठ माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच न. १ श्री. येलकर अशांना पोनि श्री. भामरे यांनी योग्य त्या सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते माझेकडे देवुन मला पंच नं.१ श्री. येलकर यांचेसह माझेकडील दुचाकी वाहनाने येवला शहराचे अलीकडे असलेल्या अंगणगांव येथील हॉटेल अतिथी येथुन येवला तालुका पोलीस स्टेशन येथे नागरे पोलीस यांचे भेटीकरीता रवाना केले. त्यावेळी पोनि श्री. भामरे, पंच नं. २ श्री. गायित व सापळा पथक असे अंगणगांव येथील हॉटेल अतिथीचे समोर शासकीय वाहनात थांबुन राहिले होते. त्यानंतर मी व पंच नं. १ श्री. येलकर असे माझे कडील दुचाकी वाहनाने येवला तालुका पोलीस स्टेशन येथे नागुन पोलीस स्टेशन समोर माझी दुचाकी उभी करून पोलीस स्टेशन मधील ठाणे अंमलदार करीत असलेले नागरे पोलीस यांची भेट घेवुन त्यांचेशी माझे कामाबाबत बोलणे केले. त्यानंतर बोलत बोलत ते आम्हाला पोलीस स्टेशनचे आवारात मोकळया परिसरात घेवुन आले. त्यावेळी नागरे पोलीस यांनी अपघाताच्या गुन्ह्याशी संबंधीत असलेले कागदपत्र देण्यासाठी व अपघाताग्रस्त वाहन सोडण्यासाठी माझ्याकडे प्रथमतः १०,०००/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती ८,०००/- रुपयांची लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नं. १ श्री. येलकर असे माझे दुचाकीवरुन अंगणगांव येथील अतिथी हॉटेल समोर शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद करुन पोनि श्री. भामरे यांनी मला व पंच क. १ श्री. येलकर यांना घडलेली हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे सांगीतलेल्या हकिगती वरुन व व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझेत व नागरे पोलीस यांच्यात रेकॉर्ड झालेले संभाषण पोनि श्री. भामरे, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्यांनी ऐकल्यानंतर माझेकडे नागरे पोलीस हे अपघाताच्या गुन्ह्याचे

कागदपत्रांच्या नकला देण्याच्या व अपघातग्रस्त वाहन सोडण्याच्या मोबदल्यात १०,०००/- रुपयांच्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ८,०००/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याची सर्वांची खात्री झाली. नागरे पोलीस यांनी मला लाचेची रक्कम ८,०००/- रुपये व ट्रान्सपोर्ट कंपनीने अपघातग्रस्त वाहन ताब्यात घेण्याकामी ॲथोरीटी दिलेले भगवतसिंह जडेजा यांना सोबत घेवुन दिनांक २८/०२/२०१९ रोजी येवला तालुका पोलीस स्टेशन येथे बोलविल्याचे दिनांक २८/०२/२०१९ रोजी येण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर पोनि श्री. भामरे यांनी मला लाचेची रक्कम व दुचाकी वाहन घेवुन दिनांक २८/०२/२०१९ रोजी ११:०० वाजता पुन्हा अंगणगांव येथील हॉटेल अतिथी समोर हजर राहण्याची समज देवुन मला घरी जाण्यास सांगीतल्याने मी तेथुन निघुन गेलो होतो. याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा पोलीस निरीक्षक श्री. भामरे यांनी केला आहे.

मी दिनांक २७/०२/२०१९ रोजीचे दिलेल्या तक्रारी वरुन दिनांक २७/०२/२०१९ रोजी झालेल्या पडताळणी कारवाई नंतर दिनांक २८/०२/२०१९ रोजी पुढील कारवाईसाठी पोनि.श्री.भामरे यांनी पंच व पथकासह प्रयत्न केला असता नागरे पोलीस यांना काहीतरी संशय आल्याने त्यांनी मला भेटण्यास टाळाटाळ करून मला इतर पोलीसाकरवी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करुन गाही घेवुन जाण्याची परवानगी दिली. तसेच दिनांक ०३/०३/२०१९ रोजी होमगार्ड करवी गुन्ह्याचे घटनास्थळाचा पंचनामा व मयत विठ्ठल मराठे यांच्या पी. एम. नोटस् च्या नकला पाठवुन दिल्या. त्याबाबत पोनि श्री. भामरे साहेब यांनी वरील तारखांना वेळोवेळी सविस्तर पंचनामे केलेले आहेत.

दिनांक ०३/०३/२०१९ रोजीचे कारवाईनंतर नागरे पोलीस यांनी मला प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष फोनव्दारे संपर्क केला नाही म्हणुन मी दिनांक ०७/०३/२०१९ व दिनांक ०८/०३/२०१९ रोजी नागरे पोलीस यांना मोबाईलवरुन संपर्क साधला असता नागरे पोलीस यांनी प्रत्युत्तर दिले नाही आणि त्यांचा कॉल रिसिव्ह केला नाही. त्यानंतर दिनांक ०९/०३/२०१५ रोजी सदर अपघाताचे तपासी अंमलदार श्री. सुरासे यांनी मला फोन करुन सांगितले की, तुम्ही अथवा सदर अपघातातील मयत विठ्ठल निंबा मराठे यांचे कोणत्याही नातेवाईकास ॲक्सिडेंट क्लेम अथवा इतर कारणासाठी लागणारी मोटार अपघाताची कागदपत्र घेण्यासाठी येवला येथे येण्याची आवश्यकता नसुन सर्व कागदपत्र हे मयत विठ्ठल निंबा मराठे यांचे राहते पत्त्यावर पोरटाने पाठविण्यात येतील असे सांगितले. त्यावरुन माझी, पंचांची व पोनि श्री. भामरे साहेब व सापळा पथकाची खात्री झाली की, येवला तालुका पोलीस स्टेशनचे नागरे पोलीस यांना कहीतरी संशय आल्याने मला भेटण्यास टाळाटाळ करुन त्यांनी मागणी केल्याप्रमाणे ते लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत. त्यानंतर दि.३०/०४/२०१९ रोजी पो.नि.श्री.भामरे यांनी मला फोनवरुन कळविले की, नागरे पोलीस यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळाली आहे. त्यावरुन पुढील कारवाईसाठी मला येवला शहर पोलीस स्टेशन येथे दि.०१/०५/२०१९ रोजी नागरे पोलीस यांचेविरुध्द फिर्याद देणेकामी हजर राहणे बाबत कळविले. परंतु मी माझ्या व्यवसायानिमीत्त परराज्यात असल्याने मला सदर दिवशी फिर्याद देणेकामी हजर राहणे शक्य नव्हते. त्यानंतर वेळोवेळी पो.नि.श्री.भामरे यांनी फोनद्वारे मला हजर राहणेकामी संपर्क केला होता, परंतु मी परराज्यात असल्याने व माझे काम पुर्ण न झाल्याने मी फिर्याद देणेकामी हजर राहु शकलो नाही. माझे काम पुर्ण झाल्याने मी आज रोजी फिर्याद देणेकामी पोलीस स्टेशन हजर झालो आहे.

अशा प्रकारे दिनांक ०८/०२/२०१९ रोजी सोमठाणे घाट, ता. येवला येथे टाटा कंपनीच्या बसवा अपघात होवुन त्यात माझे नातेवाईक विठ्ठल निंबा मराठे रा. डेराबर्डी, राजीव दादा नगर, चाळीसगांव यांचा मृत्यु झाला त्याबाबत येवला तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. मयत ड्रायव्हर विठ्ठल मराठे यांचे ॲक्सिडेंट क्लेमसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मला देण्यासाठी व अपघातग्रस्त वाहन सोडण्यासाठी गणेश अशोक नागरे, पोलीस हिपाई, बक्कल नं. ४४२, नेमणुक - येवला तालुका पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण रा. बिल्डींग नं.३, रुम नं.१३, पोलीस वसाहत, तालुका पोलीस लाईन, येवला, ता.येवला, जि.नाशिक यांनी दिनांक २७/०२/२०१९ रोजी पंच साक्षीदार श्री. येलकर यांचे समक्ष येवला तालुका पोलीस स्टेशन येथे १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ८,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केल्याने माझी त्यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील सांगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहिली असुन ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली.

Scanned with CamScanner